# प्रेसनोट

जा.क्र.पोउप-आ/वाहतूक/ ७६२२ /२०१८ पुणे शहर, दिनांक - २०.०८.२०१८

**विषय :- बकरी ईद निमीत्त करण्यात आलेल्या वाहतूक व्यवस्थेबाबत.**

---

दिनांक २२.०८.२०१८ रोजी पुणे शहरात बकरी ईद साजरी होणार आहे. त्या निमीत्त मुस्लीम बांधव एकत्र येऊन आप-आपल्या मोहल्यातील मशिद व ईदगाह मैदानावर / सार्वजनिक ठिकाणी सामूहीक नमाज पठण करून ईद साजरी करतात. त्यावेळी ईदगाहचे जवळपास मोठया प्रमाणावर वाहनांची गर्दी होते. सदर ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, तेजस्वी सातपुते,पोलीस उप आयुक्त,वाहतुक पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहनें,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

गोळीबार मैदान, ईदगाह या ठिकाणी दिनांक २२.०८.२०१८ रोजी सकाळी ०६.३० वा. पासून नमाज पठण पुर्ण होई पर्यंत **मम्मादेवी चौक ते गोळीबार मैदान चौक ते ढोले पाटील (सेव्हन लव्हज) चौक** दरम्यानची वाहतूक सर्व प्रकारच्या वाहनांसाठी आवश्यकते नुसार बंद करण्यात येणार आहे. नमूद रस्त्यावरील वाहन चालकांनी खालील प्रमाणे पर्यायी मार्गाचा येणे-जाणेसाठी वापर करावा.

| अ.क्र. | बंद मार्ग | पर्यायी मार्ग |
|---|---|---|
| १ | गोळीबार चौकातून स्वारगेटकडे जाणारा मार्ग हा नमाज पठणाच्या वेळी बंद करण्यात येईल. | गोळीबार चौकातून डाव्या बाजूस वळून सीडीओ चौक पुणे उजवीकडे वळून गिरीधर भवनचौक पुढे उजवीकडे वळून सेव्हन लव्हज चौकातून इच्छित स्थळी जाने. |
| २ | सीडीओ चौक ते गोळीबार चौकाकडे येणारी वाहतुक नमाज पठण काळात सकाळी ०७.०० ते १०.०० वा.चे वेळेत पुर्णता बंद करण्यात येईल. | लुल्लानगरकडून येवून खाण्या मारुती चौकाकडे जाणारी वाहतुक खटाव बंगला चौक-नेपीयर रोड-मम्मादेवी चौक किंवा वानवडी बाजार चौक-भैरोबानाला येथुन किंवा गिरीधर भवन चौकातून इच्छितस्थळी जाने. |
| ३ | सेव्हन लव्हज चौका कडून गोळीबार मैदानकडे येणारी वाहतुक बंद करण्यात येईल. | सल्सबरी पार्क-सीडीओ चौक-भैरोबानाला येथून इच्छितस्थळी जाने. |
| ४ | सोलापूर रोडने मम्मादेवी चौक येथे येणारी वाहतुक ही गोळीबार चौकाकडे जाणारा मार्ग बंद करण्यात येईल. | मम्मादेवी चौक बिशप स्कुल मार्गे किंवा कमांड हॉस्पीटल मार्गे डायवर्शन करुन पुढे इच्छितस्थळी किंवा नेपअर रोडने पुढे सीडीओकडे जाने. |
| ५ | भैरोबानाला ते गोळीबारकडे जाणारी वाहतुक भैरोबानाला येथे बंद करुन एम्प्रेस गार्डन व लुल्लानगरकडे वळविण्यात येईल. | प्रिन्स ऑफ वेल रोडने किंवा भैरोबानाला-वानवडी बाजार चौक येथून इच्छितस्थळी |
| ६ | कोंढवा परीसरातून गोळीबार कडे येणा-या | सदर वाहनांनी लुल्लानगर चौकातून भैरोबानाला |

| | | |
|---|---|---|
| | सर्व जड माल वाहतुक वाहने,प्रवासी वाहतुक करणारी जड वाहने,एसटी बसेस, पीएमपीएमएल बसेस यांनी यांना मनाई करण्यात येत आहे. | चौक किंवा गंगाधाम चौकातून इच्छित स्थळी जाने. |

याखेरीज शहरातील अन्य भागातील ठिकाणचे ईदगाह मैदानावर नमाज पठण होत असते, सदर भागातील वाहतूकीचे परिस्थितीनुसार तेथील वाहतूक बंद अथवा अन्य मार्गाने वळविण्यात येईल, तरी वाहन चालकांनी पोलीसांना सहकार्य करून संभाव्य गैरसोय टाळावी.